# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र.म.वि. 5656. C/47 दिनांकः– 16/3/ २०१७.

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
संस्थेंतर्गत सर्व संलग्नीत महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ,नागपूर.

विषयः–विद्यार्थी प्रवेश अर्जामध्ये निवडणूक मतदार यादीमध्ये नांव नोंदविल्याबाबत माहिती समाविष्ठ करणेबाबत.

संदर्भः–प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.युएनआय/२०१७/विशि–१/२५५२, दि. ०१–०३–२०१७.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेअंतर्गत असलेल्या महाविद्यालयातील **विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जामध्ये आपण मतदार यादीमध्ये आपले नांव नोंदविले आहे काय? अशा प्रकाराचा अतिरिक्त तपशिल अर्जामध्ये नमुद करण्याबाबत शासनाने निर्देश दिले असून आगामी प्रवेश सत्रातील विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जामध्ये वरिल अतिरिक्त तपशिलाचा समावेश करावा**. आपल्या सुलभ संदर्भाकरिता शासन पत्रांच्या प्रती सोबत जोडल्या असून सदर पत्रातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास तसेच विद्यापीठास पाठवावा.

कळावे.

आपला,

(प्रदिप बिनीवाले)
उपकुलसचिव (अति.कार्य.)

सहपत्रे : वरिलप्रमाणे

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय,(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,पुणे ४११००१
Web: www.dhepune.gov.in Mail Id: vishi.dhepune@.in
फोन नं.०२०/२६१२२१११,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स०२०/२६१११११५३

क्र.- युएनआय / २०१७/विशि - १ / २५५२ दि. २८/२/२०१७

1 MAR 2017

प्रति,

१ कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
२ सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,

**विषय** - विद्यार्थी प्रवेश अर्जामध्ये निवडणूक मतदार यादीमध्ये नाव नोंदविल्याबाबत माहिती समाविष्ट करणेबाबत.

**संदर्भ** - १. शासनाचे पत्र क्र सर्कीण २०१६/ प्र.क्र.६३८ /विशि-३ दि. ९/२/२०१७

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाकिंत शासन पत्राचे अवलोकन व्हावे. सोबत प्रत जोडली आहे.

आपल्या विद्यापीठाच्या प्रवेश अर्जामध्ये आपण मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदविले आहे काय? अशा प्रकारचा अतिरिक्त तपशील मागणीचा समावेश करुन आठ दिवसाच्या आत शासनास सुधारीत अर्जाचे नमूने सादर करण्याबाबत तसेच परदेशी व परराज्यातील विद्यार्थ्याबाबत निर्माण होणा-या अडचणी तपासून याबाबत व प्रत्येक विद्यार्थ्याला १८ वर्षे पूर्ण ज्या टप्प्यावर पुर्ण होतील तेव्हा मतदान नोंदणी अनिवार्य करण्याबाबत आपले अभिप्राय शासनास तात्काळ सादर करावेत व एक प्रत संचालनालयास सादर करण्यात यावी.

(सुयश दुसाने)
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य पुणे, - १

प्रत - १.मा. श्री.सतिश माळी, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०००३२

पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव
कुलसचिव